# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 11 April 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ११ एप्रिल २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- महाराष्ट्रात विविध प्रकल्पातून रेल्वे सेवेचं जाळं अधिक विकसित होत असल्याचं रेल्वे मंत्र्यांचं प्रतिपादन–छत्रपती शिवराय स्थळदर्शन रेल्वे सर्किटची मुख्यमंत्र्यांकडून घोषणा
- एसटी कर्मचाऱ्यांचा पगार यापुढे दरमहा सात तारखेला–महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांचं आश्वासन
- प्रसिद्ध उद्योजक मधुर बजाज यांचं आज पहाटे मुंबईत निधन
- राज्यात १५ ते ३० एप्रिल दरम्यान `जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचं आयोजन`

आणि

- क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त सर्वत्र अभिवादन

****

महाराष्ट्रात सतराशे कोटी रुपयांहूनअधिक गुंतवणुकीच्या विविध प्रकल्पातून रेल्वे सेवेचं जाळं अधिक विकसित होत असल्याचं प्रतिपादन, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलं आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. या सर्व प्रकल्पांचा त्यांनी यावेळी आढावा घेतला.

**बाईट – रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव**

पावसाळ्यात रेल्वे सेवा बाधित होऊ नये, यासाठी रेल्वेच्या अभियंत्यांनी दोन वर्षांच्या संशोधनातून एक यंत्रणा विकसित केल्याची माहिती रेल्वेमंत्र्यांनी यावेळी दिली. या संदर्भात रेल्वेला पेटंटही मिळणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते. छत्रपती शिवरायांशी संबंधित ऐतिहासिक स्थळदर्शन असणारं रेल्वे सर्किट लवकरच राज्यात सुरु होईल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

दरम्यान, मुंबईत पुढच्या महिन्यात होणाऱ्या वेव्ज परिषदेच्या अनुषंगाने माहिती आणि प्रसारणमंत्री वैष्णव यांनी आढावा घेतला. सर्जनशील क्षेत्रातून उभ्या राहणाऱ्या अर्थव्यवस्थेत महाराष्ट्र आणि मुंबईचं स्थान अतिशय महत्त्वाचं असून बदलत्या तंत्रज्ञानाच्या या काळात हे स्थान अबाधित राखण्याच्या उद्देशानं वेव्हज् २०२५चं आयोजन मुंबईत होणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी बोलतांना, हा कार्यक्रम दरवर्षी आयोजित करण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची इच्छा असून तो मुंबईतच होईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

****

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहेत. आज रात्री आठ वाजता त्यांचं पुण्यात आगमन होईल. उद्या सकाळी रायगड जिल्ह्यात पाचाड इथं राजमाता जिजाऊ यांच्या, तर रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचं दर्शन घेऊन, तिथल्या कार्यक्रमात सहभागी होतील. उद्या संध्याकाळी मुंबईत गुजराती साप्ताहिक पत्रिका चित्रलेखाच्या ७५व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला शहा उपस्थित राहणार आहेत.

****

राज्य परिवहन महामंडळ कर्मचाऱ्यांचा पगार दर महिन्याच्या सात तारखेला होईल, असं आश्वासन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिलं आहे. ते आज एसटी मुख्यालयात महामंडळाच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर बोलत होते. राज्यातल्या बस स्थानकांचा खाजगी विकासकांच्या माध्यमातून बांधा-वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्त्वावर विकास करण्यात येणार असून त्यापैकी पहिल्या टप्प्यातील ६६ जागांची निविदा प्रक्रिया लवकरच सुरू होणार असल्याचं सरनाईक यांनी सांगितलं.

दरम्यान, आज झालेल्या बैठकीत वित्त सचिव सौरभ विजय यांनी कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनासाठी तातडीने १२० कोटी रुपये देण्याचे निर्देश दिले असून त्यानुसार

शासन निर्णय काढण्यात आला आहे. येत्या मंगळवारी कर्मचाऱ्यांना उर्वरित वेतन देण्यात येईल अशी माहिती सरनाईक यांनी दिली.

****

प्रसिद्ध उद्योजक मधुर बजाज यांचं आज पहाटे मुंबईत निधन झालं. ते ७३ वर्षांचे होते. हृदय विकाराचा झटका आल्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून त्यांच्यावर ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरु होते. बजाज ऑटो या दुचाकी वाहन उद्योग समुहाचे ते मानद संचालक तसंच महाराष्ट्र स्कूटर लिमिटेडचे अध्यक्ष होते. बजाज यांच्या निधनाबद्दल छत्रपती संभाजीनगर इथं उद्योग क्षेत्रातून शोक व्यक्त होत आहे.

****

जलसंपदा विभागामार्फत १५ ते ३० एप्रिल दरम्यान ‘जल व्यवस्थापन कृती पंधरवडा’ साजरा केला जाणार आहे. या पंधरवड्याच्या आयोजनासंदर्भात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक झाली. या पंधरवड्याच्या माध्यमातून जलसाक्षरतेसाठी विविध उपक्रम राबवून जल व्यवस्थापनावर अधिक भर द्यावा, असं आवाहन विखे पाटील यांनी केलं. या बैठकीला जलसंपदा तसंच आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते.

****

थोर समाजसुधारक, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्यात येत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज महात्मा फुले यांना आदरांजली वाहिली. देशासाठी त्यांचं अमूल्य योगदान प्रत्येक पिढीला प्रेरणा देत राहील, असं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

नवी दिल्लीतल्या महाराष्ट्र सदन इथं महात्मा फुले यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला सचिव आर.विमला यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत शासकीय निवासस्थानी, मंत्रालयात कौशल्य विकास, उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी तसंच विधान भवन इथं सचिव मेघना तळेकर यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महात्मा फुले यांना अभिवादन केलं. पवार यांच्यासह चंद्रकांत पाटील यांनी पुण्यात फुलेवाड्याला भेट देऊन महात्मा फुले यांना अभिवादन केलं.

****

छत्रपती संभाजीनगर शहरातल्या औरंगपुरा भागातील महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला विविध संघटनांच्या वतीनं पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. यानिमित्त विविध विषयांवरील व्याख्यानं झाली तसंच रक्तदान शिबिर घेण्यात आलं.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त छत्रपती संभाजीनगर इथं संत सावता महाराज विद्यार्थी वसतिगृहात विद्यार्थी सत्कार समारंभ पार पडला. इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

****

महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त आज धाराशिव इथं फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीनं विविध शासकीय योजनांची माहिती देणारे चित्र प्रदर्शन भरवण्यात आलं. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार यांच्या हस्ते या प्रदर्शनाचं उद्घाटन झालं. त्यांनी याबाबत अधिक माहिती दिली –

**बाईट – जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार**

****

बीड इथल्या शासकीय निरीक्षणगृह इथं महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात ७ ते १४ एप्रिल दरम्यान भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव साजरा होत आहे. यानिमित्त विद्यापीठात इतिहास वस्तू संग्रहालयाच्या प्रांगणात ग्रंथ महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. पालक मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते आज या महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आलं. विद्यापीठातील वसतीगृहासाठी २५ कोटी रूपयांचा निधी सामाजिक न्याय विभागातर्फे देण्यात येईल, अशी ग्वाही शिरसाट यांनी दिली.

****

परभणी महावितरण मंडळ कार्यालयात छतावरच्या सौरऊर्जा प्रकल्पाचं आज पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते लोकर्पण झालं. जिल्ह्यातील प्रत्येक कार्यालय तसंच घरकुल योजनेद्वारे हा प्रकल्प प्रस्तावित करुन हरित ऊर्जा निर्मिती केली जाणार असल्याचं बोर्डीकर यांनी सांगितलं.

****

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त असलेल्या शासकीय सुट्टीमुळे लातूर इथल्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग सोमवारी बंद राहणार आहे. मात्र रविवारी १३ तारखेला बाह्यरुग्ण विभाग नियमित वेळेप्रमाणे अर्धवेळ सुरु राहील, असं रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांनी कळवलं आहे.

****

हनुमान जन्मोत्सव उद्या साजरा होत आहे. उद्या पहाटे ठिकठिकाणच्या हनुमान मंदिरांमध्ये हनुमान जन्मासह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या खुलताबाद इथं भद्रा मारूतीच्या दर्शनासाठी भाविकांच्या होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर, दौलताबाद घाट रस्ता आज सायंकाळी पाच वाजेपासून ते उद्या रात्री दहा वाजेपर्यंत जड वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे.

****

घरगुती गॅस सिलेंडर दरवाढी विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं आज बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आलं. यावेळी महिलांनी चूल पेटवून, भाकरी थापून निषेध व्यक्त केला.

****